# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. ११/०२/२०१५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा बुधवार दिनांक ११/०२/२०१५ रोजी सभा सुचना क्र. १८ दि. ०६/०२/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. प्रशांत एन. केळूसकर हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. प्रशांत एन. केळूसकर | सभापती |
| २. | श्री. परशुराम प. म्हात्रे | सदस्य |
| ३. | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ४. | सौ. मंदाकिनी गावंड | सदस्या |
| ५. | श्री. हरिश्चंद्र आंमगावकर | सदस्य |
| ६. | श्री. अश्विन श्यामजी कासोदरीया | सदस्य |
| ७. | श्री. हंसुकुमार कमलकुमार पांडे | सदस्य |
| ८. | सौ. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ९. | श्री. स्टिवन जॉन मेंडोन्सा | सदस्य |
| १०. | श्री. मुन्ना सिंह | सदस्य |
| ११. | श्रीम. नयना म. वसाणी | सदस्या |
| १२. | श्री. मोहन जाधव | सदस्य |
| १३. | श्री. सुहास माधवराव रकवी | सदस्य |
| १४. | श्री. जयंतीलाल पाटील | सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. नरेश तुकाराम पाटील | सदस्य |

**मा. सभापती :-**

आजची सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडू या. सचिवांनी सभेला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा बुधवार दि. ११/०२/२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १८, दि. ०६/०२/२०१५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

**नयना वसानी :-**

आपण मागच्या स्थायी समितीच्या मिटींगमध्ये नागरी आपत्ती धोके निवारण ह्याच्यावर ठराव पास करुन मंजूरी दिली आहे. त्याचा अभ्यास करता त्याच्यात खूप त्रूटी आढळल्या आहेत. माझी सर्व महोदयांना अशी विनंती आहे की, हा विषय थांबवून पुन्हा घ्यावा. कारण शासनाचे पैसे वाया जातात.

**मा. सभापती :-**

कोणत्या प्रकारच्या त्रूटी तुम्हाला दिसलेल्या आहेत.

**नयना वसानी :-**

सर्वर रुमची किंमत १ लाख ३८ हजार दिलेली आहे.

**मा. सभापती :-**

तुमच्याकडे सगळे लेखी आहे का?

**नयना वसानी :-**

माझ्याकडे आहे. ज्यांना आपण ह्या निविदा दिलेल्या आहेत ती एक ट्रान्सपोर्ट कंपनी आहे. मोटोरोला वायरलेसची डिलरशीप त्यांच्याकडे आहे का? त्याच्याकडे ट्रान्सपोर्टचा जो व्हॅट किंवा सर्व्हिस टॅक्स आहे. तो ट्रान्सपोर्टसाठी पास झाला आहे की कुठल्या बिझनेससाठी पास झालेला आहे ह्याचे आपल्या निविदामध्ये काय-

काय विचारले त्याचा शासकीय अनुभव काय आहे त्या निविदामध्ये ज्या अटीशर्ती आहेत त्या त्यांनी पूर्ण केल्या आहेत का?

**मा. सभापती :-**

माझ्या माहितीप्रमाणे आपण हा ठराव जेव्हा मंजूर केला तेव्हा त्यात आलेल्या त्रूटी डिझास्टर मॅनेजमेन्टच्या बाबत आपण सिस्टम मॅनेजरला त्यासाठी सांगितले त्यांनी ते भाव काढले.

**नयना वसानी :-**

साहेब सिस्टम मॅनेजर जे आहे त्या कधीपासून कामाला लागल्या त्यांच्या किती सुट्टया झाल्या. महासभेची अवमानना करुन त्यांना घेण्यात आले. त्याचे पत्र मा. आयुक्तांना देऊन आज महिना होत आला पण त्याचे उत्तर अजून मिळत नाही. त्यांनी काही करायचे आणि आम्ही चालवून घ्यायचे का?

**राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय यह फायर डिझास्टर मॅनेजमेन्ट के अंदर हमने जो काम किया यह बिलकूल मोनो व्हिजन में काम किया इस टेंडर में शर्ते निकली उसका हमे ज्ञान नहीं। टेंडर की शर्ते लिगल है की इनलिगल है। बाकी मनपा में जो टेंडर की शर्ते है वह शर्तो की कॉपी प्लस वहाँ पर जो बिड्स गई है उनकी कॉपी होगी तब हम ढंग से स्टडी कर पायेंगे। टेंडर में जो ट्रान्सपोर्ट कंपनी का.............

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

नाही. निर्णय मा. आयुक्त घेणार.

**सुहास रकवी :-**

मग कशाला बसता. सभापती साहेब ह्यांनी घेतलेले निर्णय कायम असतील का हे आम्ही तुम्हाला विचारतो.

**दिपक कुरळेकर (मा. उपायुक्त) :-**

निर्णय मा. आयुक्तच घेतील.

**सुहास रकवी :-**

मग सभा पोस्टपोन करा.

**राजेंद्र जैन :-**

मा. सभापती महोदय सिनियारिटी के हिसाब से कुरळेकर साहब लास्ट दो साल से देख रहा हूँ। बारकुंड साहब को इधर क्यों नहीं बुलाया गया।

**मा. सभापती :-**

ते शहर अभियंता आहेत त्यांना घेण गरजेच होते.

**सुहास रकवी :-**

मा. सभापती महोदय काही गोष्टी तुमच्या निदर्शनास आल्या. तुम्ही अंमलबजावणी करा. आता निर्णय घेतील तो मा. आयुक्त मान्य करतील? गेल्यावेळेला अभ्यास दौऱ्याचा गणेश देशमुख साहेबांनी निर्णय घेतला तो शितोळे साहेबांनी रद्द केला. निर्णय घेण्याची क्षमता असलेले अधिकारी इथे बसवा. मा. सभापती महोदय ह्यापूढे तुम्ही मा. आयुक्त महोदयांना एक पत्र द्या की सक्षम अधिकारी असेल कारण वेळ वाया घालू नका ही विनंती.

**मा. सभापती :-**

धोरणात्मक अधिकारी नसल्याने मा. आयुक्तांनी मागच्या एका प्रकरणामध्ये नकार दर्शवल्यामुळे पूढच्या मिटींगला मा. आयुक्तांना सांगण्यात यावे की, इथे उपस्थित राहून अधिकार असलेल्या अधिकाऱ्याला इथे बसवावे. सदर सभेच्या विषयासकट नयना वसानी यांनी मान्यता दिलेला डिझास्टरचा विषय व मागील सभेमधील सर्व विषय असे एकत्र करुन आजची सभा दि. १६/०२/२०१५ रोजी ११.०० वाजता लावण्यात येते.

**सुहास रकवी :-**

आज दि. ११/०२/२०१५ रोजीची मा. स्थायी समिती सभा निर्णयात्मक अधिकारी किंवा मा. आयुक्त अनुपस्थित असल्या कारणाने आजची स्थायी समितीची सभा दि. १६/०२/२०१५ रोजी ११.३० वाजता घेण्यात यावी असा ठराव मांडत आहे व सन्मा. सदस्यांनी दिलेले विषय त्या सभेत सादर करण्यात यावे अशी सुचना मांडत आहे.

**नयना वसानी :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**सभा तहकुबी ठराव क्र. १३९ :-**

आज दि. ११/०२/२०१५ रोजीची मा. स्थायी समिती सभा निर्णयात्मक अधिकारी किंवा मा. आयुक्त अनुपस्थित असल्या कारणाने आजची स्थायी समितीची सभा दि. १६/०२/२०१५ रोजी ११.३० वाजता घेण्यात यावी असा ठराव मांडत आहे व सन्मा. सदस्यांनी दिलेले विषय त्या सभेत सादर करण्यात यावे अशी सुचना मांडत आहे.

**सुचक :- श्री. सुहास रकवी** **अनुमोदक :- डॉ. नयना वसाणी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

आजची सभा तहकुब करण्यात आली असे जाहिर करतो.

**(सभा संपल्याची वेळ ११.५५ वाजता.)**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

